# प्रेसनोट

जा.क्र.-पोउप-आ/वाहतूक/ ९०५७ /२०१७ पुणे शहर, दिनांक ०७.०२.२०१७.

**विषय :- दिनांक ११ फेब्रुवारी २०१७ रोजीच्या राष्ट्रीय लोकन्यायालया बाबत.**

---

दिनांक- ११.०२.२०१७ रोजी मोटार वाहन न्यायालय,शिवाजीनगर पुणे येथे राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन केले असून सदर दिवशी मोटार वाहन कायद्याअंतर्गत दाखल झालेल्या वाहतूक विभागाचे प्रकरणांचे निकाल सामोपचाराने मिटविण्यासाठी ठेवण्यात आले आहेत.तरी ज्या इसमांविरुध्द पुणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत मोटार वाहन नियमांचे उल्लंघन केलेली प्रकरणे न्यायालयात तारीख ३०.११.२०१६ पर्यंत दाखल करण्यात आलेली असतील त्यांनी दिनांक ११.०२.२०१७ रोजी मोटार वाहन न्यायालय,शिवाजीनगर पुणे येथे सकाळी १०.३० वाजता हजर राहिल्यास राष्ट्रीय लोकन्यायलयात सामोपचाराने खटला मिटविण्यासाठी घेता येईल.

सन २०१६ चे गु.र.न. १५००० पर्यंतचे गुन्हा दाखल असलेल्या इसमांनी आपला गुन्हा रजिस्टर नंबरची माहिती सोबत आणावी.सदर गुन्हा नंबर आपल्याकडे नसल्यास सदर गुन्हा रजिस्टरची माहिती ज्या वाहतूक विभागात आपणावर कारवाई करण्यात आली त्या ठिकाणी मिळू शकेल. तसेच स्वतःचे नाव मोटार वाहन न्यायालयाच्या court.mah.ni.in या संकेतस्थळावर सर्च केल्यास सबंधीत खटल्याची माहिती मिळू शकेल. तसेच येताना सोबत आपले ओळखपत्र जसे निवडणूक ओळखपत्र,पॅनकार्ड,आधारकार्ड किंवा ओळखीचे तत्सव दस्त बरोबर आणावा. न्यायालयाचे समन्स किंवा लोक अदालतची नोटीस आपणास जरी प्राप्त झाली नसेल तरी न्यायालय खटला क्रमांकाच्या व गुन्हा नोंदणी क्रमांकाच्या आधारे किंवा नोटीस तथा समज पत्राच्या आधारे आपला खटला लोकअदालत मध्ये ठेवता येईल.

तरी नमूद दिवशी लोकन्यायालयात नागरिकांनी आपल्या खटल्यांची वेळेत निर्गती करुन घेणे बाबत वाहतूक शाखा पुणे शहर यांचेकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.